# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


महाराष्ट्र पोलीस

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६० /२०२२ दि. १५ /०८/२०२२

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी**, कासारवडवली वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. १९/०८/२०२२ रोजी **"स्वामी प्रतिष्ठान"** तर्फे **"गोपाळकाला"** निमित्त दहिहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्त नागरीक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. त्या कालावधीत सदर परिसरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत व सुरक्षित राहण्यासाठी, आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी**, मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणुन, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए./११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुण पुढीलप्रमाणे अधिसुचना जाहीर करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) उपवन, पवानगर कडून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना त्यागराज बिल्डींग कट येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने त्यागराज बिल्डींग कट येथे उजवे बाजूस वळण घेवून वसंतविहार स्कूल सर्कल, वसंतविहार सर्कल (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ) मार्गे पुढे तुलशीधाम रोडने ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) वसंतविहार सर्कल (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) कडुन काशिनाथ घाणेकर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना लोकपुरम पब्लीक स्कुल कट येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने वसंत विहार सर्कल (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) येथुन ईच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) खेवरा सर्कल कडुन हिरानंदानी मिडॉस–डॉ.काशिनाथ घाणेकर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना शिवसेना शाखा क्र.०४ समोर खेवरा सर्कल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने खेवरा सर्कल येथुन दोस्ती इंम्पीरिया बिल्डींग मार्गे सर्व्हिस रोडने ईच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसुचना दि. १९/०८/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते रात्रौ २२.०० वा. चे दरम्यान लागू राहील. सदरची अधिसुचना पोलीस वाहने, रूग्णवाहीका, फायरब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )<br>
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर<br>
अतिरिक्त कार्यभार<br>
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CS CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी,ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/ वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक,ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रतः– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे /वागळे व पो.निरी. कासारवडवली, कापुरबावडी, वागळे वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner